# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,

१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१

दुरध्वनी ०२०-२६१२५६९६, फॅक्स ०२०- २६१२२२१७

e-mail dydpune@gmail.com. website - www.dydepune.com


जा.क्र. शिउसं/प्राथ-२०२/२०१८-१९/ ७३६६ दिनांक – -7 OCT 2019

प्रति,

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद पुणे**

विषय- शाळेच्या नावात बदलाबाबत

संदर्भ- १. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे यांचे पत्र जा.क्र.जिज.प. शिक्षण/प्राथ/खाप्राशा-२/११६४/२०१९

२. संस्था ठराव क्रं दि १०.०८.२०१९

उपरोक्त विषयबाबत कळविण्यात येते की, संदर्भीय पत्रान्वये आपण निनाईदेवी शिक्षण संस्था संचलित पॅराडाईज इंग्लिश मिडीयम स्कूल, धनकवडी, पुणे या विदयालयाच्य नावात बदल करून चाटे पब्लिक स्कूल, धनकवडी, पुणे असा बदल करणेसाठी प्रस्ताव शिफारशीसह पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयास सादर केलेला आहे.

सदर प्रस्तावासोबत सादर केलेला संस्थेचा ठराव दि १०.०८.२०१९ तसेच आपली स्पष्ट शिफारस पहाता निनाईदेवी शिक्षण संस्था संचलित पॅराडाईज इंग्लिश मिडीयम स्कूल, धनकवडी, पुणे या विदयालयाच्य नावात बदल करून चाटे पब्लिक स्कूल, धनकवडी, पुणे असा बदल करणेबाबतची नोंद या कार्यालयाच्या रजिस्टर मध्ये घेण्यात आली असून त्याप्रमाणे बदललेल्या नावाने या पुढील पत्र व्यवहार करण्यात यावा.

(प्रविण अहिरे)
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे-०१**

**प्रत :**

अध्यक्ष/सचिव, निनाईदेवी शिक्षण संस्था धनकवडी, पुणे

मुख्याध्यापक, चाटे पब्लिक स्कूल, धनकवडी, पुणे

जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता/पुवि
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : - 7 JUN 2006

प्रति,

शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
पुणे.

**विषय :** सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत (माध्यम - इंग्रजी). . .

**संदर्भ :** शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक नप्राशा-१७०६/(११४/०६)/प्राशि-३, दिनांक १६ मे, २००६

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व संपूर्ण पत्ता | प्रस्तावित शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | निनाईदेवी शिक्षण संस्था, गुरुप्रसाद अपार्टमेंट, धनकवडी, पुणे | धनकवडी, पुणे | इंग्रजी | १ ली |

**कायम विनाअनुदानीत**

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेश समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. **२०/-** च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. **२०/-** च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. **२०/-** च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर **इंग्रजी** माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करून ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता.)

स्थळप्रतीवर मा. शि. उ. स. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१ करिता.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. मा. अध्यक्ष/सचिव निनाईदेवी शिक्षण संस्था, गुरुप्रसाद अपार्टमेंट, धनकवडी, पुणे

२०६३४/३८

**कायम विनाअनुदान तत्वावर**
**(माध्यम इंग्रजी )**

जाक्र. प्राथ-२/खाप्राशा/मा.इंग्रजी /२०१५
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 14 OCT 2015

प्रति

शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे

विषयः प्रथम परवानगी मिळणेबाबत
निनाईदेवी शिक्षण संस्था, गुरुप्रसाद अपार्टमेंट धनकवडी, पुणे संचलित पॅराडाईज इंग्लिश मिडीयम स्कुल, धनकवडी पुणे

संदर्भः १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र नप्राशा-१७०६/(११४/२००६) प्राशि-३ दिनांक १६.०५.२००६.
२. प्रशासन अधिकारी मनपा पिंपरी चिंचवड यांचे पत्र क्र.शिक्षण/खाप्राशा /३/कावि/८५७४/खाप्राशा/१३-१४ दि. १३.०२.२०१४
३. या कार्यालयाचे पत्र दिनांक २५.०६.२०१५
४. आपले पत्र जा.क्र./खाप्राशा/३२३/२०१५-१६ दि. ०३.०९.१५.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला संदर्भ क्र-१ अन्वये तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व इंग्रजी माध्यमासाठी सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु न करता सदरची शाळा सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. २ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२००८ पासून इ. १ ली च्या वर्गास शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १. | निनाईदेवी शिक्षण संस्था, धनकवडी पुणे | पॅराडाईज इंग्लिश मिडीयम स्कुल, धनकवडी | १ ली | इंग्रजी | जुन २००८ |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणसंकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तीशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यांत येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिका-यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील.अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.१३ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्याआदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर,२००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

---

---

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

**(रामचंद्र जाधव)**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे-१.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

३.अध्यक्ष/सचिव,
निनाईदेवी शिक्षण संस्था, धनकवडी पुणे

**शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,**
१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र.शिउसं/प्राथ-२/पुवि/२०१६-१७ / 22230 दिनांक- 30 DEC 2016

**प्रति,**
मुख्याध्यापक
पॅराडाईज इंग्लिश मिडियम स्कूल धनकवडी, जि. पुणे

**विषय-** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील तरतुदीनुसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१५-१६ या वर्षापासून इ.५ वी व इ. ८ वीचे वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास मान्यता देण्याबाबत.

**संदर्भ-** शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१६/प्र.क्र.११/एसएम-५, दि. २० संप्टेंबर २०१६.

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थीच्या प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी चा वर्ग तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी च्या उच्च प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वीचा वर्ग जोडण्यास अहमदनगर, पुणे आणि सोलापूर जिल्हयातील शाळेस खालील अटींच्या व शर्तीच्या अधिन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे.

| शासन यादी क्र. | संस्थेचे नाव/शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | इयत्ता | ज्या वर्षी पासून मंजूर करावयाचे ते वर्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| ६ | पॅराडाईज इंग्लिश मिडियम स्कूल धनकवडी, जि. पुणे | इंग्रजी | ८ वी | २०१५-१६ | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |

**अटी व शर्ती :-**

१. शाळेला वर्ग खोली उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
२. या आदेशान्वये ज्या शाळांना वर्ग मंजूर करण्यात आले आहेत त्या शाळांची पट संख्या विहित निकषाप्रमाणे असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी करावी.
३. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये शाळांनी भौतिक सोई सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.
४. या आदेशान्वये मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित शाळांमधील इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीच्या वर्गाना शासन मान्यता दिल्यामुळे अनुदानाचा कोणताही हक्क प्राप्त होत नाही. या वर्गांना अनुदान लागु करणे हा शासनाचा स्वेच्छा अधिकार असून निधीच्या उपलब्धतेनुसार त्याची अंमजबजावणी करण्यात येईल.
५. तसेच शासन निर्णय दिनांक. २८.०८.२०१५ नुसार नैसर्गीक बंद करण्यात आलेली असल्याने इयत्ता ५ नंतर इयत्ता ८ वी नंतर प्रस्तुत शाळांना नैसर्गीक वाढ लागू रहणार नाही.

संदर्भीय शासन निर्णयानुसार आपल्या जिल्हयातील शासनाने मंजूर केलेल्या इयत्ता ५ व इयत्ता ८ वीचे वर्ग जोडण्याबाबत उपरोक्त अटी व शर्तीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास, संचालनालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे.१.

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर :-**
मा. शिक्षण संचालक (प्राथ) महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य) जिल्हा परिषद पुणे, अहमदनगर, सोलापूर

**कायम विना अनुदान तत्त्वावर**
(मराठी,इंग्रजी, हिंदी, उर्दू , तामिळ इत्यादी माध्यम)

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
कै.भाउसाहेब शिरोळे भवन,
शिवाजीगर, पुणे ५
जा.क्र. /खाप्राशा / ६३६५
दि. 3|3|१६

**प्रति,**
**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका**
**पॅराडाईज इंग्लिश मिडीयम स्कूल ,**
**धनकवडी , पुणे.४३.**

**विषयः-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. व्हीएलएस.-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.२३ सप्टेंबर २००३

उपरोक्त विषयासंबधीचा तुमच्याकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा /वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक शैक्षणिक वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | **पॅराडाईज इंग्लिश मिडीयम स्कूल ,** | इंग्रजी | २ री<br>३ री<br>४ थी<br>५ वी<br>६ वी<br>७ वी | सन २००९-१०<br>सन २०१०-११<br>सन २०११-१२<br>सन २०१२-१३<br>सन २०१३-१४<br>सन २०१४-१५ | |

**अटी व शर्ती**

१) शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२) सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३) सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
**६) सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.**
७) तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८) पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.
**९) आर. टी. ई. ॲक्ट २००९ चे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.**

3/3/16
(बी.के.दहिफळे)
प्रशासकीय अधिकारी

**शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,**
१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र.शिउसं/प्राथ-२/पुवि/२०१६-१७ / 22230 दिनांक-

**प्रति,** 30 DEC 2016

मुख्याध्यापक
पॅराडाईज इंग्लिश मिडियम स्कूल धनकवडी, जि. पुणे

**विषय-** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील तरतुदीनुसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१५-१६ या वर्षापासून इ.५ वी व इ. ८ वीचे वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास मान्यता देण्याबाबत.

**संदर्भ-** शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१६/प्र.क्र.११/एसएम-५, दि. २० संप्टेबर २०१६.

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थीच्या प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी चा वर्ग तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी च्या उच्च प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वीचा वर्ग जोडण्यास अहमदनगर, पुणे आणि सोलापूर जिल्हयातील शाळेस खालील अटींच्या व शर्तींच्या अधिन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे.

| शासन यादी क्र. | संस्थेचे नाव/शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | इयत्ता | ज्या वर्षी पासून मंजूर करावयाचे ते वर्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| ६ | पॅराडाइज इंग्लिश मिडियम स्कूल धनकवडी, जि. पुणे | इंग्रजी | ८ वी | २०१५-१६ | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |

**अटी व शर्ती :-**

१. शाळेला वर्ग खोली उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
२. या आदेशान्वये ज्या शाळांना वर्ग मंजूर करण्यात आले आहेत त्या शाळांची पट संख्या विहित निकषाप्रमाणे असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी करावी.
३. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये शाळांनी भौतिक सोई सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.
४. या आदेशान्वये मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित शाळांमधील इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीच्या वर्गांना शासन मान्यता दिल्यामुळे अनुदानाचा कोणताही हक्क प्राप्त होत नाही. या वर्गांना अनुदान लागु करणे हा शासनाचा स्वेच्छा अधिकार असून निधीच्या उपलब्धतेनुसार त्याची अंमजबजावणी करण्यात येईल.
५. तसेच शासन निर्णय दिनांक. २८.०८.२०१५ नुसार नैसर्गीक बंद करण्यात आलेली असल्याने इयत्ता ५ नंतर इयत्ता ८ वी नंतर प्रस्तुत शाळांना नैसर्गीक वाढ लागू रहणार नाही.

संदर्भीय शासन निर्णयानुसार आपल्या जिल्हयातील शासनाने मंजूर केलेल्या इयत्ता ५ व इयत्ता ८ वीचे वर्ग जोडण्याबाबत उपरोक्त अटी व शर्तींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास, संचालनालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे.१.

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर :-**
मा. शिक्षण संचालक (प्राथ) महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य) जिल्हा परिषद पुणे, अहमदनगर, सोलापूर

# पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१.
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in


## प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/503/3205 /2024 पुणे 1 दिनांक: 10/06/2024

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
निनाईदेवी शिक्षण संस्था, धनकवडी, जि. पुणे संचालित
चाटे पब्लिक स्कूल ( 27251601021 ) धनकवडी, पुणे-43

विषय - सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शासन निर्णय क्र. प्रशाव-2016/प्र.क्र.1/एसएम-5, दिनांक 20/09/2016 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई

2.मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.शिउसं/प्राथ-2/पुवि/2016-17/22239,दिनांक 30/12/2016

3. शाळेकडील प्रथम मान्यता प्रस्ताव दिनांक 10/05/2024

4.श्री.सुनिल गच्चे, उपशिक्षणाधिकारी, जि.प.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल 22/05/2024

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये कळवण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसारआपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | निनाईदेवी शिक्षण संस्था, धनकवडी, जि. पुणे | चाटे पब्लिक स्कूल ( 27251601021 ) धनकवडी, पुणे-43 | इंग्रजी | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 8 वी | 2015-16 |

### अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. प्रशाव-2016/प्र.क्र.1/एसएम-5, दिनांक 20/09/2016 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. **भविष्यात या शाळेच्या प्रथम मान्यते बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्धवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.**

( *संजय नाईकडे* )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे